CR1980011801

४. जर परिच्छेद २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली तर, निरनिराळ्या भांडारांच्या नोंदवह्या अद्यावत तर होतीलच शिवाय अशा अद्यावत नोंदीमुळे परिच्छेद ३ मध्ये दर्शविलेल्या अनावश्यक खरेदीच्या कारणापैकी काही टाळणेही शक्य होईल. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आपल्या अंमलाखाली येणाऱ्या भांडारांचे बाबतीत प्रशासकीय विभाग प्रमुखांना व कार्यालय प्रमुखांना ह्या बाबतीत ह्या आदेशांची फक्त प्रत न पाठविता, योग्य अशा सुचना निर्गमित कराव्यात व त्याचे पालन होते की नाही, ह्यासंबंधी योग्य ती काळजी घ्यावी.

उदा. — अ) कार्यभार हस्तांतरण अहवालात आल्यानंतर भांडार तपासणीबद्दल अहवाल दिला आहे काय ? असल्यास, भांडारासंबंधी त्रुटी आहेत काय ?

आ) किती भांडारांना वर्षातून अनपेक्षितपणे भेटी देऊन भांडार तपासणी करण्यात आली ? त्यासंबंधी अहवाल काय ? त्रुटी असल्यास, कार्यवाही काय करण्यात आली ?

इ) ज्या ज्या वेळी भांडारांतील वस्तुंचे निर्लेखिकरण करावयाचे असेल तेव्हा, संबंधित आदेशांत भांडाराचे नाव, वस्तु, किंमत इत्यादी तपशील देण्यात यावा व प्रत संबंधित भांडारास पाठविण्यात यावी. त्यामुळे नोंदवही अद्यावत ठेवण्यास मदत होईल, आणि भांडार पडताळणीचे वेळी अशी प्रकरणे नजरेस आणण्यात आल्यास, त्यांची योग्य ती दखल पडताळणी पथकांकडून घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल ह्यांचे आदेशानुसार व नावाने,

नि. वि. देऊस्कर,
सहाय्यक सचिव, वित्त विभाग.

प्रति

महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व प्रशासकीय विभाग/कार्यालय प्रमुख,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे/नागपूर,
निवड नस्ती शाखा, एडीएम-९.

---

क्रमांक अे१/1573
पुणे, दिनांक 3 -३-१९८०.

प्रत- सर्व उपसंचालक भूमिअभिलेख यांनी ( जादा प्रतींसह) माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

कौ.वि.जाधव
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमिअभिलेख, म. रा. पुणे यांचे करिता.

प्रत- कार्यासन अधिकारी अे२, ३, अे-१, २, ३ / अभिलेखापाल यांना माहितीसाठी.

एच-१२३२(७०००+५-१-८०)अ.

K.W.PC
1573
1573 for S.O. D.L.R. Pune